
# विद्यापीठ आणि सीईटी परीक्षा नव्याने जाहीर होणार

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांची घोषणा



**मुंबई** : राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनेचा एक भाग म्हणून विद्यापीठ, महाविद्यालयीन आणि सीईटी परीक्षेचे नियोजित वेळापत्रक पुढे ढकलण्यात आले आहे. मात्र, विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता, या सर्व परीक्षेचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे, असे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी जाहीर केले.

सोमवारी सकाळी त्यांनी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी सेलकडून पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षा रद्द होणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. या सर्व परीक्षेचे वेळापत्रक नव्याने जाहीर केले जाईल.

या सर्व परीक्षेचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमाळकर, एसएनडीटी विद्यापीठाचे कुलगुरु शशिकला वंजारी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव, स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून महाविद्यालयीन परीक्षेचे वेळापत्रक नियोजन, शैक्षणिक वर्षाचे नियोजन असा अहवाल तयार करून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सादर करतील. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.

**विद्यापीठात मल्टिपर्पज लॅब सुरू करा**

राज्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अकृषी विद्यापीठांमध्ये विविध प्रकारच्या आजारांसंदर्भातील चाचण्या घेता येतील, अशा स्वरूपाच्या मल्टिपर्पज लॅब सुरू करण्याच्या सूचनाही सामंत यांनी दिल्या. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने अशाप्रकारची लॅब सुरू केली आहे. यासाठी केंद्र शासन, राज्य शासन आणि आरोग्य विभागाच्या आवश्यक त्या सर्व परवानग्या तातडीने देण्यात येतील. याच पार्श्वभूमीवर राज्यातील इतर विद्यापीठांनी आपल्याकडे अशाप्रकारच्या लॅब सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले.

**एनएसएस विद्यार्थ्यांचीही मदत**

आरोग्य यंत्रणेला सहकार्य करण्यासाठी एनएसएस विद्यार्थ्यांचीही मदत घेता येईल का, याचा सर्व विद्यापीठांनी विचार करावा. काही दिवसांपूर्वी सोलापूर विद्यापीठाने आरोग्य यंत्रणेला सहकार्य करण्यासाठी एक प्रयोग सुरू केला आहे. एनएसएसच्या २७ विद्यार्थ्यांना त्यांच्या आई-वडिलांकडून परवानगी घेऊन प्रशिक्षण देऊन आरोग्यसेवेच्या यंत्रणेसाठी सज्ज केले. याच धर्तीवर राज्यातील इतर विद्यापीठांमध्येसुद्धा एनएसएसचे विद्यार्थी आरोग्य यंत्रणेच्या सेवेसाठी घेता येतील का, याचा अहवाल सादर करावा, अशा सूचनाही सामंत यांनी केल्या.

**ऑनलाइन समुपदेशन सेवेला सुरुवात**

कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिकांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या उद्‌भवत आहेत. त्यांना चिंता, अनिश्चितता, निराशा, सामाजिक विलगीकरण आणि असुरक्षितपणाचा सामना करणे कठीण जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेदेखील लोकांच्या मानसिक आरोग्यावर आणि धोक्यामध्ये वावरणाऱ्या लोकसंख्येवर कोरोनाचा प्रभाव नोंदवून त्याबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने पुढाकार घेऊन कोव्हिड १९च्या उद्रेकाच्या मानसिक परिणामास सामोरे जाण्यासाठी विद्यापीठाच्या उपयोजित मानसशास्त्र विभागाने ऑनलाइन मानसिक आरोग्य साहाय्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. ही समुपदेशन सेवा वेब-आधारित स्वरूपात दिली जात आहे. विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. विवेक बेल्हेकर यांनी ही संकल्पना आखली आहे. अशाप्रकारे इतर विद्यापीठांनीही सुविधा सुरू करावी असेही त्यांनी सांगितले.

**एका दिवसाचे वेतन द्या**

कोव्हिड १९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाला आपले योगदान म्हणून राज्यातील सर्व विद्यापीठांतील कर्मचारी/अधिकारी यांनी त्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पुढारी

# सीईटीसह विद्यापीठाच्या परीक्षा होणारच : उदय सामंत

## परिस्थिती निवळताच वेळापत्रक जाहीर करणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सर्व विद्यापीठे आणि त्याअंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयीन परीक्षेसह सीईटीची परीक्षा होणारच आहेत. मात्र, या सर्व परीक्षा कोरोनाची परिस्थिती आटोक्यात आल्यानंतरच होतील. या सर्व परीक्षांचे नियोजन व वेळापत्रक करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी दिली.

राज्यातील सर्व १३ विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधत मंत्री सामंत यांनी विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षांसह सीईटी परिक्षांबाबत आढावा घेतला. यात विभागाचे सचिव सौरभ विजय, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, सीईटी सेलचे आयुक्त संदीप कदम, मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे संचालक राजीव मिश्रा सहभागी होते.

सामंत म्हणाले, कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी सेलकडून परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असल्या तरी त्या रद्द होणार नाहीत. या सर्व परीक्षा होणारच आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची खबरदारी सरकार घेईल. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, या सर्व परीक्षांचे वेळापत्रक नव्याने जाहीर केले जाईल. मात्र, कोरोनाची परिस्थिती निवळल्यानंतरच या परीक्षा घेतल्या जातील. जर आगामी काळात कोरोनामुळे परिस्थिती आणखी चिघळली आणि आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली तर त्याबाबत आमचा मप्लॅन- बीफ तयार आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी याबाबत मनात कोणताही संभ्रम बाळगण्याची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### समितीत देवानंद शिंदे यांचा समावेश

या सर्व परीक्षांचे नियोजन आणि नियंत्रण करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, एसएनडीटी विद्यापीठांचे कुलगुरू शशिकला वंजारी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षांबाबत संभ्रम

## राज्यपालांची सर्व कुलगुरूंबरोबर आज बैठक; ६८० परीक्षांचा समावेश

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कोरोनामुळे देशभर लॉकडाऊन करण्यात आला असून अद्याप परीक्षा घेण्याबाबत राज्य सरकारकडून कोणताच निर्णय झाला नसल्याने शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. परीक्षा कधी सुरू होणार या चिंतेने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम वाढला आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून यापूर्वीच खबरदारीचा उपाय म्हणून राज्य सरकारने महाविद्यालये व अधिविभाग बंद ठेवण्याचे आदेश दिले. शिक्षकांना वर्कफॉर्म होम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सुरुवातीला विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा ३१ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४ एप्रिलपर्यंत देशभर लॉकडाऊन जाहीर केला आहे.

सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्हा विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असून २९३ महाविद्यालये असून विद्यापीठातील ४० अधिविभागांचा समावेश आहे. परीक्षा विभागाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या सुमारे ६८० परीक्षा घेण्यात येतात. तीन जिल्ह्यांतून २ लाख ५० हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसतात. परीक्षेसाठी दोन महिन्यांचा कालावधी लागतो. त्यानंतर ३० ते ४५ दिवसांत परीक्षांचे निकाल जाहीर केले जातात.

सध्या लॉकडाऊन सुरू असून आठवडाभरात संपणार आहे. नुकतेच, उच्चशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठाच्या कोणत्याच परीक्षा रद्द न करण्याची भूमिका जाहीर केली आहे. अद्याप, शासन व उच्चशिक्षण विभागाकडून परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय झालेला नाही. शासनस्तरावरून आदेश नसल्याने विद्यापीठाने सुधारित वेळापत्रक तयार केलेले नाही. १४ एप्रिलनंतर लॉकडाऊन वाढते की कमी करण्यात येते, याची कल्पना कोणालाच नाही. त्यामुळे विद्यापीठ परीक्षांबाबत विद्यार्थी, पालकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. सर्व गोष्टी वेळेत न झाल्यास विद्यापीठ परीक्षा व त्यांच्या निकालाचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे.

### उच्च शिक्षणमंत्र्यांनी घेतली आढावा बैठक

उच्च शिक्षणमंत्र्यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, उच्चशिक्षण संचालक यांच्यासमवेत सोमवारी आढावा बैठक घेतली. यात लॉकडाऊनमुळे उद्‌भवलेली परिस्थिती, विद्यापीठांचे कामकाज, परीक्षा याबाबत चर्चा झाली. मंगळवारी दुपारी तीन वाजता राज्यपालांसमवेत सर्व कुलगुरूंची बैठक होईल. यात विविध विषयासंदर्भातील निर्णय होण्याची शक्यता आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

> कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. अद्याप परीक्षा घेण्याबाबत शासनाकडून कोणतेही आदेश आलेले नाहीत. सरकारच्या निर्देशानुसार परीक्षा विभाग पुढील कार्यवाही करेल.
>
> **- जी.आर.पळसे,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ